भूगोल दिन अहवाल

१४ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयात 'भूगोल दिन' आयोजित करण्यात आला होता. भारतीय भूगोलशास्त्रज्ञ डॉ. सी.डी देशपांडे यांच्या स्मरणार्थ हा दिवस राष्ट्रीय भूगोल दिन म्हणून साजरा केला जातो. या कार्यक्रमाचे आयोजन भूगोल मंडळाचे प्रमुख प्रा.श्री सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुविद्या सरवणकर यांनी भूषविले कार्यक्रमाच्या सुरुवातिला भूगोल तंत्रज्ञ डॉ. सी. डी. देशपांडे यांच्या स्मृतीला पुष्प अर्पण करून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. भूगोल मंडळाच्या विद्यार्थ्यांनी या महत्त्वपूर्ण दिवसाचे महत्त्व अधोरेखित करून कार्यक्रमाच्या आयोजनाची जबाबदारी स्वीकारली व भूगोल दिनाचे महत्त्व स्पष्ट करणारी भाषणे दिली तसेच डॉ सोनवणे यांनी भूगोल दिन स्थितीचा आढावा घेत भूगोलाचे महत्व अधोरेखित केले. हा कार्यक्रम डॉ सोनवणे यांनी आयोजित केला.